Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
E-mail.: appointment.a@unishivaji.ac.in, appointment.b@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004
महाराष्ट्र
फोन : ईपीबीएक्स - २६०९०००, ०२३१- २६०९१०२, ०२३१-२६०९१०३

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/ 449 दि. 20 JUL 2023

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था/अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :– दि. 20 जूलै, 2023 रोजी होणा–या सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा स्थगित करणेबाबत.**
**संदर्भ :– नै. आ./1093/2023, दि. 19/07/2023 रोजीचे मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांचे पत्र**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, भारतीय हवामान खात्याने दि. 20/07/2023 रोजी सातारा जिल्हयाला अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्टचा इशारा दिलेला असल्याने उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा यांनी सातारा जिल्हयातील पश्चिमेकडील तालुके (पाटण, महाबळेश्वर, जावळी, वाई आणि सातारा) मधील सर्व माध्यमांच्या शाळा व महाविद्यालयांना दि. 20/07/2023 रोजी सुट्टी जाहीर केली आहे.

सबब, कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या **दि. 20 जूलै, 2023 रोजी होणा–या सर्व अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात येत आहेत.** तसेच स्थगित करण्यात आलेल्या परीक्षेचे नविन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील/अधिविभागातील सर्व शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी, विद्यार्थी व इतर सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणावे. तसेच सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in-Exam Section–Circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

(डॉ. अजितसिंह जाधव)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1. मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
   सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था/अधिविभाग,
   शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. मा. कुलगुरू कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. संकेतस्थळ विभाग – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
5. जनसंपर्क विभाग – योग्य त्या प्रसिध्दीसाठी
6. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
7. आयटी कक्ष, सर्व परीक्षा विभाग, – यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी

D/March 2022 Exam/Letter1

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

## नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन

दुरध्वनी क्रमांक:- 02162-232175 ई-मेल:- rdcsatara@gmail.com

---

जा.क्र./नै.आ./1093/2023 दिनांक: 19/07/2023

**वाचा :-**

1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.
2. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडछील शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-2019, प्र.क्र.199 /एसडी-2 दिनांक 02/08/2019
3. शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-2019/प्र.क्र..199/एसडी-2 दि. 23/12/2019
4. विभागीय उपसंचालक मुंबई यांचेकडील पत्रक्र.सिउसं/माध्यमिक/संकिर्ण/2022/7077, दिनांक 13/07/2022
5. भारतीय हवामान विभाग मुंबई यांचेकडील पूर्वसूचना दिनांक 17/07/2023.
6. मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याकडील दि.19/07/2023 रोजी आयोजित केलेल्या v/c तील सूचना.
7. मा.शिक्षण आयुक्तालय, पुणे यांचेकडील पत्र क्रं.शिआ/2023/संकीर्ण/आस्था क-माध्य/4439 दि.19/7/23.

---

**आदेश:-**

ज्याअर्थी, उक्त वाचा क्र.4 अन्वये प्रादेशिक हवामान विभागाच्या पूर्वसूचनेवरून जिल्ह्यातील त्या-त्या भागातील स्थानिक परिस्थितीचा आढावा घेवून, संपूर्ण जिल्ह्याकरीता अथवा जिल्ह्यातील ठरावीक स्थानिक क्षेत्रातील शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व संदर्भ क. 2 कडील शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीमध्ये अतिवृष्टी होत असून तसेच भारतीय हवामान खात्याने दिलेल्या पूर्वसूचनेनूसार दिनांक 20/07/2023 रोजी सातारा जिल्ह्याला अतिवृष्टी चा (Heavy to very Heavy Rainfall at Isolated places in ghat areas very likely) ऑरेज अलर्टचा इशारा देण्यात आलेला आहे. या बाबींचा विचार करता, सातारा जिल्ह्यातील पश्चिमेकडील तालुके (पाटण, महाबळेश्वर, जावली, वाई आणि सातारा) मधील सर्व माध्यमांच्या शाळा व महाविद्यालये यांना दि. 20/07/2023 रोजी सुट्टी जाहिर करणे आवश्यक असल्याचे माझे मत झालेले आहे.

Scanned with Oken Scanner

त्याअर्थी, मी जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 व दिनांक 02/08/2019 च्या शासन परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये सातारा जिल्ह्यातील पश्चिमेकडील तालुके (पाटण, महाबळेश्वर, जावली, वाई आणि सातारा) मधील सर्व अंगणवाडी, सर्व सरकारी व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका, अनुदानित व विनाअनुदानित शाळा, सर्व आश्रमशाळा, सर्व महाविद्यालये व आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षक केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था यांना दिनांक 20/07/2023 रोजी सुट्टी जाहिर करीत आहे.

उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेश आज दिनांक 19/07/2023 रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

जिल्हाधिकारी
सत्यमेव जयते
जिल्हा सातारा

(जितेंद्र डूडी)
**जिल्हाधिकारी सातारा तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा**

**प्रति :** 1.शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद सातारा यांना पुढील कार्यवाहीसाठी.
2.जिल्हा माहिती अधिकारी सातारा यांना पुढील कार्यवाहीसाठी.
3.सर्व संबंधित प्राचार्य (महाविदयालये व व्यवसाय प्रशिक्षण केंद्र) जि.सातारा यांना पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत : 1.मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
2.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.सातारा यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

Scanned with Oken Scanner